Publication : Dainik Navshakti	Edition : Mumbai
Date : April 01, 2019	Page: 10

आजपासून गृहखरेदी, कर्ज स्वस्त, देना-विजया बँकेचे बडोदामध्ये विलीनीकरण

कारच्या किंमतीत वाढ तर सीएनजी, पाईप गॅस महाग, करमुक्त उत्पन्नाच्या मर्यादेत वाढ

वृत्तसंस्था

नवी दिल्ली, दि. ३१ - नव्या आर्थिक वर्षात नव्या आर्थिक बदलांना जनतेला सामोरे जावे लागणार आहे. अर्थसंकल्पातील तरतुदी आणि जीएसटी समितीने घेतलेल्या निर्णयांची उद्या, १ एप्रिलपासून अंमलबजावणी होणार आहे. घर खरेदी करणं स्वस्त होणार असलं, कर्ज स्वस्ताई होणार असली तरी सीएनजी, पाईप गॅस महागणार आहे. तसेच कार महागणार असून घरगुती गॅस सिलिंडरचे दर वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.

करमुक्त उत्पन्नाच्या मर्यादेत वाढ

केंद्र सरकारने एक फेब्रुवारी २०१९ रोजी सादर केलेल्या हंगामी अर्थसंकल्पात वार्षिक पाच लाख रुपयांपर्यंतचे उत्पन्न करमुक्त केल्याची घोषणा केली आहे. त्यामुळे ज्यांचे वार्षिक उत्पन्न पाच लाख किंवा त्यापेक्षा कमी असेल त्यांना उत्पन्नावर प्राप्तिकर भरावा लागणार नाही. शिवाय अर्थसंकल्पात स्टॅंडर्ड डिडक्शनसंबंधित देखील घोषणा करण्यात आली होती. त्यानुसार प्रमाणित वजावटीची (स्टॅंडर्ड डिडक्शन) मर्यादा ४० हजार रुपयांवरून ५० हजार रुपयांपर्यंत वाढवण्यात आली आहे.

व्याजापोटी मिळणाऱ्या उत्पन्नावरील करकपातीची मर्यादा (टीडीएस) आता ४० हजार रुपये करण्यात आली आहे. याआधी ती १० हजार रुपये होती. ज्या व्यक्तींना बँकेत किंवा पोस्टात असलेल्या मुदत ठेवींवर व्याज प्राप्त होते. अशा ठेवीदारांना वार्षिक दहा हजार रुपयांपर्यंतच्या व्याजावर कर भरावा लागत होता. तो आता ४० हजार रुपयांपर्यंतच्या व्याजावर भरावा लागणार आहे. ठेवीदारांच्या दृष्टिकोनातून हा महत्त्वाचा निर्णय आहे.

बँकांचे विलीनीकरण

देना बँक आणि विजया बँक या दोन्ही बँकांचे बँक ऑफ बडोदामध्ये १ एप्रिलपासून विलिनीकरण होणार आहे. या बँकांचे ग्राहक आता बँक ऑफ बडोदाचे ग्राहक म्हणून ओळखले जातील. या लाखो ग्राहकांना ही बँक नवे चेकबुक आणि एटीएम कार्ड देणार आहे.

विजेचे प्रीपेड मीटर

केंद्र सरकारने २०२२ पर्यंतची मुदत दिली असून, पुढील तीन वर्षात 'स्मार्ट प्रीपेड मीटर'नेच वीजपुरवठा करणे सक्तीचे होणार आहे. मोबाइलच्या प्रीपेड सिमकार्डसारखेच विजेचे प्रीपेड मीटर असेल. त्यात शिल्लक रक्कम असेपर्यंत वीज वापरता येईल. ती संपताच वीजपुरवठा बंद होईल आणि कार्ड रीचार्ज करताच तो सुरू होईल. मागेल त्याला वीज योजनेखाली वर्षभरात २.२६ कोटी नव्या ग्राहकांना वीजजोडण्या देण्यात आल्या. १ एप्रिलपासून सर्व ग्राहकांना अविरत वीज पुरविणे कंपन्यांना सक्तीचे होईल.

भविष्य निर्वाह निधीचे खाते स्वत: ट्रान्सफर करू शकता

जर आपण १ एप्रिल नंतर नोकरी बदलणार असाल तर आपल्या जुन्या भविष्य निर्वाह निधीचे खात्यातून पैसे नव्या पीएफ खात्यामध्ये ट्रान्सफर करण्याच्या प्रक्रियेतून मुक्ती मिळेल. ईपीएफओच्या नव्या नियमांनुसार, आपले नवे खाते स्वत:हून जुन्या खात्याशी जोडले जाईल. यामध्ये कर्मचाऱ्यांच्या १२ आकडी युनिव्हर्सल अकाउंट नंबरची मदत घेतली जाईल.

१ एप्रिलनंतर तुमच्याजवळ १२५ सीसीहून जास्त पॉवरची मोटारसायकल असल्यास त्यात अँटी लॉक ब्रेकिंग सिस्टीम असणं गरजेचं आहे. त्याशिवाय १२५ सीसीमध्ये कॉम्बी ब्रेकिंग सिस्टीम असणं गरजेचं आहे.

कोणत्या सेवा होणार स्वस्त ? घर खरेदीदारांना फायदा

आता नवीन आर्थिक वर्षात जीएसटी परिषदेच्या निर्णयानुसार जीएसटीचे नवे दर लागू होणार आहेत.

यानुसार घर खरेदी करताना घराचे अथवा फ्लॅटचे काम सुरू असल्यास त्यावर १२ टक्क्यांऐवजी ५ टक्के जीएसटी लागणार आहे. त्यामुळे घरांच्या किंमती कमी होण्याची शक्यता असून याचा थेट फायदा घर खरेदी करणाऱ्यांना मिळणार आहे. तसेच एक एप्रिल २०१९पासून बांधण्यात येणाऱ्या घरांवर विकासक आणि बांधकाम व्यावसायिकांना जीएसटीचे दोन पर्याय असणार आहेत.

दोन घरे असणाऱ्यांना दिलासा

हंगामी अर्थसंकल्पात जाहीर केल्याप्रमाणे आता करदात्याकडे दुसरे घर असेल तर ते देखील 'सेल्फ ऑक्युपाइड' मानले जाईल आणि त्या माध्यमातून मिळालेल्या उत्पन्नावर कोणत्याही प्रकारचा कर द्यावा भरावा लागणार नाही. सध्या मात्र, एकापेक्षा अधिक घरे असल्यास एकच घर 'सेल्फ ऑक्युपाइड' मानले जाते आणि दुसरे घर असल्यास त्यापासून उत्पन्न मिळत आहे असे गृहीत धरून ते करपात्र मानले जात होते. आता मात्र दुसरे घर देखील 'सेल्फ ऑक्युपाइड' मानले जाणार आहे.

शेअर डिमॅट करून घ्या

फिजिकल शेअर पडून असतील तर ते कायदेशीर वारसाच्या नावाने डिमॅट करून घेणे गरजेचे आहे. सेबी'ने अशा शेअरच्या संबंधित कायद्यामध्ये बदल केले आहेत. एक एप्रिल २०१९ नंतर फिजिकल शेअरच्या हस्तांतरावर (ट्रान्सफर) निर्बंध येणार आहेत.

जीवन विमासाठी नवा जीएसटी दर

विमा कंपन्यांनाही जीएसटीच्या नव्या दराची अंमलबजावणी करावी लागणार आहे. त्यामुळे विमा संरक्षण घेणं काहीसं स्वस्त होणार आहे. २२ ते ५० या वयोगटातील तरुणाईला याचा फायदा होणार आहे.

कर्ज स्वस्ताई

कर्जावर आता आरबीआयच्या नियमानुसार रेपो रेट लावला जाणार असल्यानं रेपो रेट घटल्यास व्याजदरात घट होणार आहे. १ एप्रिलपासून याचा फायदा पोहोचण्याची शक्यता आहे.

रेल्वे बुकिंग रिफंड

१ एप्रिलपासून रेल्वेचे तिकीट काढल्यानंतर रेल्वे चुकल्यास तिकिटीचे पैसे परत मिळणार आहेत किंवा त्याच तिकिटावरून दुसऱ्या ट्रेनने प्रवास करता येणं शक्यत होणार आहे.

कोणत्या सेवा होणार महाग? सीएनजी गॅस महागणार

१ एप्रिलपासून पेट्रोलियम वस्तूंबरोबरच सीएनजी गॅसच्या किमतींमध्ये १८ टक्क्यांची वाढ होणार आहे. त्यामुळे सामान्यांच्या खिशावर अतिरिक्त भार पडणार आहे.

कारच्या दरात वाढ

१ एप्रिलपासून सर्वच वाहनांचे भाग महागणार आहेत. त्यामुळे वाहन निर्मित करणाऱ्या कंपन्या वाहनांच्या किमतीत भरमसाट वाढ करण्याची शक्यता आहे.

घरगुती गॅसचे दर वाढणार

पाइपलाइनद्वारे पुरवठा करण्यात येणारा गॅस महाग होण्याची चिन्हे आहेत. घरगुती सिलिंडरचे दरही भडकणार आहेत.

नवी नंबर प्लेट

शोरूममधून विकल्या जाणाऱ्या मोटारींवर नंबर प्लेट बसवणे एक एप्रिलपासून अनिवार्य होणार आहे. त्याचबरोबर मोटारींच्या विंडस्क्रिनवर त्याच्या इंधनाच्या प्रकाराचा उल्लेख करावा लागणार आहे.

सुप्रीम कोर्टाने विशेषत: दिल्ली, उत्तर प्रदेश, हरयाणा आणि राजस्थानमध्ये हा नियम ऑक्टोबरपर्यंत लागू करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत.